# प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी मागणीपत्र

## डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.

डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेमध्ये राज्य प्रशिक्षण धोरण २०११ नुसार राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत शासन सेवेतील अधिकारी वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/ कार्या-१२ अ, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ११ मे, २०१५ मध्ये नमूद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत.

त्यास अनुसरुन शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या कार्यालयातील राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत खालील नमूद केलेली पदे शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अशा संवर्गात इच्छूक किंवा पात्र उमेदवार न मिळून आल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नातीसाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

| अ. क्र. | पदनाम | गट | पदांची संख्या | पदांची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक वर्ग-१ | अ | १ | १५६००-३९१०० (ग्रेड पे-७६००) एस-२५, ७८८००-२०९२०० |
| २ | निबंधक तथा सहा.प्राध्यापक वर्ग-१ | अ | १ | १५६००-३९१०० (ग्रेड पे-५०००) एस-१९, ५५१००-१७५१०० |
| ३ | **सहायक प्राध्यापक वर्ग-१**<br>१) ग्राम-कृषी विकासाशी संबधीत -१ पदे<br>२) समाजकल्याण व आदिवासी विकास संबधीत-१ पद<br>३) नागरी विकास संबधीत -१ पद<br>४) अभियांत्रीकी व आरोग्य सेवे संबधीत -१ पद | अ | ४ | १५६००-३९१०० (ग्रेड पे-५०००) एस-१९, ५५१००-१७५१०० |
| ४ | वसतिगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३ | क | १ | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४२००) एस -१३, ३५४००-११२४०० |
| ५ | कार्यालयीन अधिक्षक/स्टेनो वर्ग-३ | क | १ | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४२००) एस -१३, ३५४००-११२४०० |
| ६ | ग्रंथपाल | क | १ | ५२००-२०२०० (ग्रेड पे-२४००) एस -८ २५५००-८११०० |
| | एकूण | | ९ | |

२. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमतः तीन वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तदनंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधी अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या संमतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षापर्यत वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात टंकलिखित करून त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे **दि.१७/०५/२०२६** पर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावे.

५. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२), दि. १७.१२.२०१६ व समक्रमांक दि. १६.०२.२०१८ व सामान्य प्रशासन विभाग/ (कार्या-१२अ), दि. ११.०५.२०१५ मधील निर्धारित तरतुदी, अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जाची तपासणी करण्यात येईल.

७. प्रशासकीय विभागांनी / संवर्ग नियंत्रक विभागानी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परस्थीतीत **दि.१७/०५/२०२६** पर्यत पाठवावेत. विहीत मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी / कर्मचारी यांचा विचार केला जाणार नाही.

८. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जाबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

सदर जाहीरात www.maharastra.gov.in, https://prabodhiniamravati.org.in/ व http//amravatidivision.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**कार्यालयाचा पत्ता-** डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, विद्यापीठ रोड तपोवन गेट जवळ, अमरावती पिन कोड क्र. ४४४६०२ फोन न. ०७२१-२६६८१७६

**स्वा/-**

**संचालक**

**डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशसकीय**
**व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती**